देवरा समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यातील बंद व आजारी सहकारी साखर कारखान्यांना मदत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक : ससाका-२०१८/प्र.क्र.१९४/३-स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०८ मार्च, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय क्र. ससाका-२०१८/ प्र.क्र. १९४/ ३-स, दिनांक १४.११.२०१८

२) मंत्रिमंडळ निर्णय दिनांक०५ मार्च २०१९.

प्रस्तावना:

राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या कारखान्यांना मदत करण्याबाबतच्या मागणीचा सखोल अभ्यास करुन शासनास शिफारस करणेसाठी शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ अन्वये मा.श्री राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली. बंद व आजारी सहकारी साखर कारखान्यांना मदत करण्याकरिता मागील ३ हंगामापैकी १ हंगाम बंद असलेले, मागील सलग ३ वर्षात आर्थिक तोट्यात असणारे तसेच गाळप क्षमतेच्या प्रमाणात मागील सलग तीन वर्षे ७०% क्षमतेपेक्षा कमी गाळप केलेले सहकारी साखर कारखाने या तिन्ही निकषास अनुसरून पात्र १५ सहकारी साखर कारखान्यांना मा. राजगोपाल देवरा समितीच्या शिफारशीनुसार मदत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या कारखान्यांना मदत करण्याबाबतच्या मागणीचा सखोल अभ्यास करुन शासनास शिफारस करणेसाठी शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ अन्वये गठीत केलेल्या राजगोपाल देवरा समितीच्या शिफारशीनुसार तसेच राज्यातील मागील ३ हंगामापैकी १ हंगाम बंद असलेले, मागील सलग ३ वर्षात आर्थिक तोट्यात असणारे तसेच गाळप क्षमतेच्या प्रमाणात मागील सलग तीन वर्षे ७०% क्षमतेपेक्षा कमी गाळप केलेले या निकषानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मधील १५ सहकारी साखर कारखाने आर्थिक मदतीसाठी पात्र ठरतात. देवरा समितीच्या शिफारशीवर मा. मंत्रिमंडळाने दि.०५.०३.२०१९ च्या बैठकीत सर्वकष चर्चा करून घेतलेल्या निर्णयास अनुसरून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. सदर १५ सहकारी साखर कारखान्यांपैकी १४ सहकारी साखर कारखान्यांकडील वित्तीय संस्थांचे देय कर्ज रू ७५८.८८कोटी रकमेचे, संबंधित सहकारी साखर कारखान्यांनी वित्तीय संस्थाच्या सहमतीने शासनाची थकहमी न घेता पुनर्गठन करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर १५ सहकारी साखर कारखान्यांपैकी १३ सहकारी साखर कारखान्यांकडील थकीत शासकिय देय कर्ज (व्याजासह) रू २०६.०० कोटींच्या परतफेडीस येणाऱ्या १० वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सदर कारखान्यांना रू.२०६.०० कोटीचे थकीत कर्ज १० वर्षानंतर लगेचच शासनाला एकरकमी परतफेड करणे बंधनकारक राहील. याव्यतिरक्त सदर कारखान्यांनी इतर देय असलेले हप्ते नियमित परतफेड करणे आवश्यक राहील.

३. १५ सहकारी साखर कारखान्यांपैकी ०८ सहकारी साखर कारखान्यांकडील शासन थकहमी शुल्क रू ९.८६ कोटीच्या परतफेडीसाठी १० वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सदर कारखान्यांनी १० वर्षानंतर सदरची थकहमी शुल्कांची रक्कम एकरकमी दंडणीय व्याजासह शासनास अदा करणे आवश्यक राहील.

४. सेफासू योजनेंतर्गत १५ पैकी ७ कारखान्याच्या रूपये५८.९६ कोटी येणेबाकी रक्कमेचे केंद्र शासनास वाढीव ५ वर्षाच्या कालावधीसाठी पुनर्गठन करण्याची शिफारस करण्यात यावी.

५. सदर १५ सहकारी साखर कारखान्यांपैकी ०७ कारखान्यांचे त्यांचेकडील सॉफ्ट लोनची येणेबाकी रक्कम रूपये ५३.४० कोटीस पुढील ५ वर्षासाठी पुर्नगठन करण्यास तसेच त्यासाठी १०% व्याजदराने येणाऱ्या रूपये १३.३६ कोटी आर्थिक भारास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

वित्तीय संस्थांकडून संमती प्राप्त करून सॉफ्ट लोनचे ५ वर्षासाठी पुर्नगठन करण्याची जबाबदारी संबधित कारखाना व वित्तीय संस्था यांची राहील. याबाबत सनियंत्रक म्हणून साखर आयुक्त, पुणे यांना घोषित करण्यात येत आहे. कारखान्यांनी त्यांच्याकडील सॉफ्ट लोनची येणेबाकी रक्कमेचे संबंधीत वित्तीय संस्थांकडून पुर्नगठन करून तसा अहवाल साखर आयुक्त, पुणे यांना सादर करावा.

६. सदर १५ सहकारी साखर कारखान्यांपैकी ७ सहकारी साखर कारखान्यांकडील १० वर्षावरील थकीत शासकीय भागभांडवल रक्कम रू. १२.२४ कोटीच्या परतफेडीस १० वर्षाचा वाढीव कालावधी देण्यात येत आहे. तसेच सदर कारखान्यांनी शासकीय थकीत भागभांडवल १० वर्षानंतर एकरकमी लाभांशासह शासनास अदा करणे बंधनकारक राहील.

७. मुळ शासन निर्णयातील समाविष्ट शासकीय कर्ज, शासकीय थकहमी शुल्क व शासकीय भागभांडवल हे विहित मुदतीत अदा करण्याची अट शिथील करण्यात येत आहे आणि याव्यतिरिक्त मुळ शासन निर्णयातील इतर सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील.

८. सदर १५ कारखान्यापैकी जे कारखाने त्यांच्या हिश्यापेक्षा अधिक प्रमाणात स्वभागभांडवल उभारतील, त्या कारखान्यास अनुज्ञेय असलेल्या शासकीय भागभांडवलाइतक्या रकमेपर्यंतच्या शासकीय कर्जाचे शासकीय भाग भांडवलामध्ये रूपांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

कारखान्यांनी त्यांच्या हिश्यापेक्षा अधिक प्रमाणात स्वभागभांडवल उभारल्यास शासकीय कर्जाचे शासकीय भाग भांडवलामध्ये रूपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव साखर आयुक्त, पुणे यांनी शासनास सादर करावा. तद्नंतर याबाबतचे स्वतंत्र आदेश शासन स्तरावरून निर्गमित करण्यात येतील.

०२. साखर आयुक्त, पुणे यांनी वरील निर्णयानुसार तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी.

०३. सदरहू शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०३.२०१९ रोजी झालेल्या बैइकीतील निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०४.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८२०२९३४४१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod Mankoji Valanj

Digitally signed by Pramod Mankoji Valanj
DN: CN = Pramod Mankoji Valanj, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-Operation, Marketing and Textiles Department
Date: 2019.03.10 16:59:17 +05'30'

(प्रमोद वळंज)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग) मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. मा. प्रधान महालेखाकार, (लेखापरीक्षा १/२), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
७. मा. प्रधान महालेखाकार Vaucher Level Computer Section (VLC), मुंबई.
८. मा. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई.
१०.मुख्य संचालक (साखर), भारत सरकार, ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली.
११.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
१४.मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे.
१५.संचालक, साखर विकास निधी,कृषि भवन, नवी दिल्ली.
१६.व्यवस्थपकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
१७.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. साखर भवन, मुंबई.
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९.सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
२०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
२१. वित्त विभाग (व्यय -२/ कराधान ३/ अर्थसंकल्प -३/ अर्थसंकल्प -१२)मंत्रालय, मुंबई

२२.सर्व अधिकारी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
२३.अवर सचिव (अर्थसकंल्प), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई.
२४.कार्यकारी संचालक, संबंधित सहकारी साखर कारखाने (साखर आयुक्त, पुणे यांच्यामार्फत)
२५.निवडनस्ती (३-स)

शासन निर्णय ससाका २०१८/ प्र.क्र. १९४/ ३-स, दिनांक ०८ मार्च २०१९ सोबतचे परिशिष्ट अ

अ.क्र.	सहकारी साखर कारखान्यांची नावे	शासन निर्णय					(रक्कम कोटीत)
		वित्तीय संस्थेच्या संमतीने पुर्नगठन	थकीत शासकीय कर्ज	येणे थकहमी शुल्क	सेफासू (पुर्नगठन शिफारशीस पात्र कारखाने)	सॉफ्ट लोन	शासकीय भागभांडवल १० वर्षावरील थकीत
१.	रा.बा. पाटील, जत	१५.८४	६.५	०.७७	०.००	५.२७	५.५३
२.	भिमा - पाटस	३८.१४	१०.८	१.२४	पात्र	१७.१७	०.००
३.	डॉ. बा.बा. तनपुरे	११२.०७	९.८१	०.३८	०.००	०.००	०.००
४.	के.के. वाघ	७.०४	४.२९	०.००	०.००	०.००	०.२९
५.	वसंतदादा कळवण	१७८.९५	३.७२	०.१९	०.००	०.००	०.००
६.	संत एकनाथ	६.०९	१९.१७	१.९५	०.००	०.००	०.००
७.	शरद पैठण	११.०९	३२.२०	०.००	०.००	०.००	०.००
८.	सिध्देश्वर - सिल्लोड	३४.९५	२.५५	०.५६	पात्र	०.००	०.००
९.	अंबेजोगाई	१५.७०	५०.४४	०.६०	०.००	०.००	०.३२
१०.	वैद्यनाथ	२०१.५३	५.७८	०.००	पात्र	९.१	१.८५
११.	वसंत- पुसद	३४.०४	१३.०२	०.००	पात्र	७.४२	०.२०
१२.	रामेश्वर	८१.२५	०.००	४.१७	पात्र	१.०१	१.३०
१३.	संत कुर्मादास	१८.०१	४६.१९	०.००	०.००	०.००	०.००
१४.	बारशिवहनुमान (पुर्णा यु. २)	४.१८	०.००	०.००	पात्र	४.९१	२.७५
१५.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर	०.००	१.२२	०.००	पात्र	८.५२	०.००
एकूण		७५८.८८	२०६.००	९.८६		५३.४०	१२.२४

Pramod Mankoji Valanj

Digitally signed by Pramod Mankoji Valanj
DN: CN = Pramod Mankoji Valanj, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-Operation, Marketing and Textiles Department
Date: 2019.03.10 16:59:38 +05'30'

(प्रमोद वळंज)
उप सचिव, महाराष्ट्र शासन